नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८७ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार दि. 0२ ऑक्टोंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## शिक्षण व आरोग्य संस्थांच्या सुधारणांसाठी प्रत्येक जिल्ह्यात कालबद्ध अभियान राबवा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शाळा, निवासी शाळा, आश्रमशाळा, अंगणवाडी केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, आयटीआय (ITI) आणि तंत्रशिक्षण संस्थांच्या इमारतींची देखभाल-दुरुस्ती तसेच पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी प्रत्येक जिल्ह्याने स्वतंत्र कालबद्ध अभियान राबवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे शिक्षण व आरोग्य संस्थांच्या देखभाल-दुरुस्तीबाबत आयोजित उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, गृह राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी उपस्थित होते.

अल्पकालीन व दीर्घकालीन कृती आराखडे तयार करण्याचे निर्देश

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील मूलभूत संस्थांच्या सुधारणेला सर्वाधिक प्राधान्य दिले जावे.

कालबद्ध आराखडा: प्रत्येक जिल्ह्याने ६ महिने, १ वर्ष आणि ३ ते ४ वर्षे अशा कालावधीचे अल्पकालीन व दीर्घकालीन कृती आराखडे तयार करावेत.

अभियानातील सहभाग: या अभियानात शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, आदिवासी विकास, समाजकल्याण आणि तंत्रशिक्षण विभागांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा सहभाग असावा.

प्रशासनयंत्रणा: या अभियानासाठी जिल्हाधिकारी संचालक म्हणून, तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित नागरी स्थानिक संस्थेचे मुख्यधिकारी किंवा आयुक्त सहसंचालक म्हणून काम पाहतील.

निधीचा प्रभावी वापर आणि आधुनिक पर्याय

जिल्हा नियोजन समितीचा निधी, विविध योजनांचा निधी, सीएसआर (CSR) निधी, लोकवर्गणी, डोंगरी विकास कार्यक्रम तसेच इतर उपलब्ध आर्थिक स्रोत एकत्रित करून संस्थांच्या



सुधारणेसाठी वापरावेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सुधारणेसाठी आधुनिक मॉड्युलर पर्यायांचा विचार करावा. विकेंद्रीकरणाची कार्यपद्धती आणि निधीच्या वापराबाबत वित्त विभाग व संबंधित सचिवांनी सविस्तर शासन निर्णय काढावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

विद्यार्थ्यांच्या सुविधा आणि वसतिगृहांचा आढावा

भाड्याच्या इमारतींमध्ये चालणारी वसतिगृहे, अंगणवाडी केंद्रे आणि आश्रम शाळांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक सुविधा मिळतात का, याची खात्री करावी. नव्या पद्धतीच्या लीज मॉडेलद्वारे पायाभूत सुविधा उभारण्याचे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

तसेच, महानगरपालिका शाळांमध्ये अंगणवाडी केंद्रे सुरू करण्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. सामाजिक न्याय विभागाची नाममात्र पद्धतीने सुरू असलेली आणि विद्यार्थी संख्या अल्प असलेली वसतिगृहे बंद करण्याबाबत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या मागणीवरही सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीत विविध विभागांच्या वतीने सादरीकरण करण्यात आले, तसेच कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यातील यशस्वी उपक्रमांची माहिती सादर करण्यात आली. राज्यातील सर्व जिल्ह्यांचे पालक अधिकारी आणि संबंधित विभागांचे प्रमुख या बैठकीत उपस्थित होते.

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न ! महसूल मंत्री बावनकुळे

### दुष्काळी परिस्थिती पाहून ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या तालुक्यांचाही समावेश करणार

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी, यासाठी पंचनाम्यांची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. प्रत्यक्ष दुष्काळी परिस्थिती असतानाही 'ट्रिगर-वन'मध्ये न आलेल्या सुमारे १५ ते १८ तालुक्यांचाही अचूक पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळाच्या कक्षेत समावेश करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिली.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी काहीतरी मदत त्यांच्या हातात मिळाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका असून, कॅबिनेट उपसमितीनेही त्याबाबत शिफारस केली आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि नंदुरबारमधूनही ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या, मात्र प्रत्यक्ष दुष्काळी स्थिती असलेल्या तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागण्या आल्या आहेत. त्यासाठी टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण केले जाणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

वर हिरवे दिसते, पण खाली काही नाही, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी असल्याने ट्रिगर-वनमध्ये तालुका आला आहे की नाही, यावर दुष्काळाचे मूल्यमापन न करता प्रत्यक्ष



स्थितीचा अचूक पंचनामा करणे आवश्यक आहे, असे बावनकुळे म्हणाले. पंचनामा करताना शेतकऱ्याची सही घेणे महत्त्वाचे असून, त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीची नोंद होईल. आणेवारी निश्चित झाल्यानंतर दुष्काळातील मदतीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

पंचनामे प्रत्यक्षात योग्य पद्धतीने होत आहेत की नाहीत, याची तपासणी करण्यासाठी बावनकुळे पुढील तीन दिवसांत सहा जिल्ह्यांना भेट देणार आहेत. संभाजीनगर-जालना, त्यानंतर अकोला-बुलढाणा आणि ४ ऑक्टोबरला धुळे-जळगाव येथे पाहणी केली जाणार आहे. पंचनाम्यासाठी नेमकी टीम क्षेत्रावर आहे का आणि प्रत्यक्ष परिस्थितीची योग्य नोंद होत आहे का, हे तपासणार असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल, कृषी आणि ग्रामविकास या तीन विभागांकडून पंचनामे केले जात असून त्यावर तिन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असतात. त्यामुळे तीनही विभागांनी समन्वयाने आणि अचूकपणे पंचनामे करणे आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## सहकारातून माणुसकीचा महोत्सव घडवणारे शिल्पकार : सहकार महर्षी भाईजी

बुलढाणा जिल्ह्याच्या सहकार चळवळीकडे पाहिले तर एक नाव मनात आपसूकच आदराने उभे राहते - सहकार महर्षी राधेश्यामजी चांडक, अर्थात सर्वांचे लाडके भाईजी.

बुलढाणा जिल्ह्याच्या मातीत सहकार, सर्वधर्मीय ऐक्य आणि सामाजिक बांधिलकीचा जो त्रिवेणी संगम आज वाहतो आहे, त्याचे मूळ श्रेय भाईजींच्या दूरदृष्टीला आणि अथक परिश्रमालाच जाते. त्यांचे नाव आज केवळ एका व्यक्तीचे नाव राहिले नसून, तो विश्वासाचा, श्रद्धेचा आणि प्रेरणेचा समानार्थी शब्द बनला आहे.

एका रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर

आशिया खंडातील सर्वात मोठी पतसंस्था म्हणून आज गौरवली जाणारी बुलढाणा अर्बन मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, एकेकाळी एक छोटंसं रोपटं होतं. भाईजींनी या रोपट्याला केवळ आर्थिक बळच नाही, तर माणुसकीच्या संस्काराचं खतपाणी घातलं.

त्यांच्यासाठी सहकार म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नाही. त्यांचे स्पष्ट मत आहे - पैसा हे साध्य नाही, तर माणूस घडवण्याचे, कुटुंब सावरण्याचे आणि राष्ट्र मजबूत करण्याचे ते एक साधन आहे.

याच विचारातून आज बुलढाणा अर्बनची पताका महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि देशातील अनेक राज्यांत अभिमानाने फडकत आहे. लाखो सर्वसामान्य कुटुंबांना, शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना, महिला बचत गटांना आणि उद्योजक तरुणांना या संस्थेने आत्मसन्मानाने जगण्याचे बळ दिले आहे.

**'संस्था नाही, हा परिवार आहे'**

भाईजींच्या यशाचे खरे गमक त्यांच्या माणसं जोडण्याच्या कलेत आहे. ते नेहमी सांगतात, ही माझी संस्था नाही, हा माझा परिवार आहे.

कर्मचारी हा त्यांच्यासाठी फक्त पगारी नोकर नाही, तर तो घरातील एक सदस्य आहे. त्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्याच्या मेहनतीचा सन्मान करणे हीच बुलढाणा अर्बनची खरी संस्कृती आहे. कर्मचाऱ्यांच्या याच निष्ठेने आणि एकजुटीने आज संस्था शिखरावर पोहोचली आहे. म्हणूनच ते अभिमानाने म्हणतात, बुलढाणा अर्बन मोठी झाली, कारण तिच्यातील माणुसकी मोठी आहे.

**सर्वधर्म समभाव - कृतीतून दिलेला संदेश**

भाईजींच्या विचारांची सगळ्यात मोठी श्रीमंती म्हणजे त्यांचा सर्वधर्म समभाव.

बुलढाणा अर्बनमध्ये गणेशोत्सव जेवढ्या भक्तीने आणि जल्लोषात साजरा होतो, तेवढ्याच आदराने बुद्ध जयंतीचा प्रज्ञा सोहळा, ईदचा सलोखा सोहळा आणि नाताळचा प्रेम सोहळाही साजरा होतो. धर्म वेगळे



असले तरी माणुसकी एकच, हा संदेश ते भाषणातून नाही तर कृतीतून देतात.

**सहकाराच्या पलीकडचे समाजकार्य**

भाईजींनी बुलढाणा अर्बनला केवळ बँकिंगच्या चौकटीत कधीच बंदिस्त ठेवले नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने समाजोपयोगी कार्याची एक मोठी चळवळच उभी केली आहे:

१. ज्ञान प्रबोधन: विद्यार्थी, महिला आणि शेतकऱ्यांसाठी सतत मार्गदर्शन शिबिरे, करिअर कार्यशाळा.

२. सांस्कृतिक जतन: स्थानिक कला, लोककलावंत आणि परंपरेला प्रोत्साहन देणारे उपक्रम.

३. आत्मनिर्भर भारत: महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग प्रशिक्षण आणि शेतकऱ्यांसाठी सल्ला केंद्र.

४. तीर्थयात्रा आणि पर्यटन: सभासदांना भारत दर्शन घडवणारे उपक्रम, ज्यातून एकोपा वाढतो.

**पर्यावरणाचे भान जपणारे नेतृत्व**

विकासाला पर्यावरणाचे भान असले पाहिजे, हा भाईजींचा आग्रह असतो. आर्थिक प्रगती तेव्हाच टिकेल, जेव्हा आपण निसर्गाचे ऋण लक्षात ठेवू, हे त्यांचे वाक्य संस्थेच्या प्रत्येक शाखेत कृतीत दिसते. वृक्षारोपण, जलसंधारण, स्वच्छता आणि ऊर्जा बचतीचे उपक्रम हा बुलढाणा अर्बनच्या दिनचर्येचाच भाग आहे.

थोडक्यात सांगायचे तर, भाईजी हे केवळ एका संस्थेचे अध्यक्ष नाहीत, तर ते एक संवेदनशील लोकनेते आहेत. शेतकऱ्याच्या बांधावरचा आधार, महिलेच्या आत्मविश्वासातील बळ आणि तरुणाच्या स्वप्नातील दिशा म्हणजे भाईजी.

आज आशिया खंडात प्रथम क्रमांकावर विराजमान असलेल्या बुलढाणा अर्बनच्या यशामागे एका तपस्वी माणसाची द्रष्ट्या नजर, न थकणारी जिद्द आणि माणसांवर असलेली अढळ श्रद्धा आहे.

अशा या सहकारातून समाज घडवणाऱ्या आणि माणसात माणुसकी रुजवणाऱ्या सहकार महर्षींना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**- प्रा. सुभाष लहाने**
**राज्य सचिव,**
**असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर ऑफ इंडिया, महाराष्ट्र प्रदेश**
**९४२२१ ८४४९४**



# कमाईसोबत आर्थिक नियोजन, बचत आणि गुंतवणुकीची शिस्त आवश्यक : सुधीर भगत

## आर्थिक साक्षरता व धनसंपत्ती वृद्धीवर मार्गदर्शन; अनामप्रेमच्या अंध विद्यार्थ्याने केले प्रास्ताविक, पाहुण्यांची करून दिली ओळख

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

कष्टाने कमावलेल्या पैशाचे योग्य नियोजन, बचत आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून आर्थिक स्वातंत्र्य व सुरक्षित भविष्य साधता येते. त्यासाठी प्रत्येकाने आर्थिक साक्षर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील अर्थतज्ज्ञ सुधीर भगत यांनी केले.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन (एड), अहिल्यानगर आणि इंटेरियर डिझायनर्स असोसिएशन यांच्या वतीने पुण्याचे ज्येष्ठ गुंतवणूक तज्ञ

सुधीर भगत यांचे 'आर्थिक साक्षरता व धनसंपत्ती वृद्धी' या विषयावर टिळक रोडवरील हॉटेल राज पॅलेस येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुधीर भगत यांनी उपस्थितांना आर्थिक नियोजनाच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात आर्थिक स्वातंत्र्य, मुलांच्या शिक्षणाचे नियोजन, सेवानिवृत्ती नियोजन, निष्क्रिय उत्पन्न, महागाई, भारताच्या आर्थिक विकासाची वाटचाल तसेच म्युच्युअल फंड, ड्खझ, ड्थझ आणि कर बचत यांसह विविध विषयांवर माहिती देण्यात आली. कमाईबरोबरच खर्च, बचत आणि गुंतवणुकीचा योग्य समतोल साधणे तसेच भविष्यातील आर्थिक उद्दिष्टांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे भगत यांनी सांगितले.दिव्यांग विद्यार्थ्याने प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख

करून दिली.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले ते अनामप्रेमचा दिव्यांग विद्यार्थी अविनाश कोळेकर ऊर्फ 'सरपंच' याचे प्रास्ताविक. अविनाश कोळेकर याने कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत उपस्थितांचे स्वागत केले तसेच कार्यक्रमातील पाहुण्यांची ओळख करून दिली. आत्म विश्वासाने आणि प्रभावीपणे केलेल्या प्रास्ताविकाचे उपस्थितांनी कौतुक केले.

सुधीर भगत यांच्याकडून

सामाजिक बांधिलकी जपत अर्थतज्ज्ञ सुधीर भगत यांनी अनामप्रेम संस्थेला संगणक भेट दिला. अंध विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या शैक्षणिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी या संगणकाचा उपयोग होणार आहे. भगत यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

यावेळी अनामप्रेमचे अध्यक्ष अजित माने, तसेच पालक डॉ. प्रकाश सेठ आणि अभय रायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. अनामप्रेमच्या कार्याला विविध स्तरांतून मिळणाऱ्या सहकार्यामुळे अंध विद्यार्थ्यांना शिक्षण, आत्म निर्भरता आणि तंत्रज्ञानाच्या



माध्यमातून पुढे जाण्यास मदत होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमासाठी ऋणानुबंध परिवाराचे श्री. अजित रोकडे तसेच परिवारातील पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या सहकार्याबद्दल आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रम ाच्या आयोजनासाठी अनाम प्रेम संस्थेचे अध्यक्ष अजित माने , एडचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे, उपाध्यक्ष इंजि. सुनील औटी, सचिव इंजि. भूषण पांडव, तसेच इंटेरियर डिझायनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सागर कुंदूर, सेक्रेटरी व्रजेश शाह आणि ट्रेझरर अंकुर सुपेकर यांनी पुढाकार घेतला.

सुवर्णम प्राईड चे संचालक व उद्योजक श्री. धुमाळ ,

संबंधित क्षेत्रातील व्यावसायिक, नागरिक तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. दातेंच्या हस्ते पारनेर-नगरमध्ये 'पीएम सूर्यघर'चा शुभारंभ..

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**



घरगुती वीजबिलाचा खर्च कमी करण्याबरोबरच सौरऊर्जे चा वापर वाढविण्याच्या उद्देशाने पारनेर-नगर विधानसभा म तदारसंघात 'पीएम सूर्य घर-म ोफत वीज योजना'ची विशेष मोहीम सुरू करण्यात आली. आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १) या मोहिमेचा शुभारंभ झाला.

घराच्या छतावर सोलर पॅनेल बसवून वीज निर्मिती करण्याचा पर्याय नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरदरम्यान विशेष दर व सुविधा देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या योजनेनुसार पात्र लाभार्थ्यांना ३ किलोवॅटपर्यंतच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी केंद्रीय अनुदानाचा लाभ मिळू शकतो. तसेच राष्ट्रीयकृत बँकांमार्फत कर्ज सुविधेची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मोहिमेअंतर्गत ३ किलोवॅट सिस्टीमची विशेष किंमत १ लाख ६० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी १ लाख १० हजार रुपये, तर ५ किलोवॅटसाठी २ लाख ५० हजार रुपये अशी माहिती देण्यात आली. सोलर पॅनेल, इन्व्हर्टर, सर्व्हिसिंग, वॉरंटी आदींबाबत संबंधित विक्रेत्यांकडून सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

'वीज समस्येवर दीर्घकालीन पर्याय हवा'

वीजपुरवठा आणि लोडशेडिंगबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येतात. त्यामुळे वीज खर्चात बचत करण्याबरोबरच नागरिकांना दीर्घकालीन पर्याय मिळावा, या उद्देशाने सौरऊर्जेचा पर्याय अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. सोलर संच बसविणाऱ्या संबंधितांकडून नागरिकांना योग्य मार्गदर्शन व सेवा मिळावी, यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कागदपत्रे तयार ठेवण्याचे आवाहन

योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी वीजबिल, आधार कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, घरपट्टी किंवा ७/१२ उतारा तसेच वीजबिलाशी जोडलेला मोबाईल क्रमांक अशी कागदपत्रे तयार ठेवावीत. सोलर संच बसविण्यापूर्वी योजनेची पात्रता, अधिकृत अनुदान, अंतिम किंमत, कर्जाच्या अटी, वॉरंटी आणि सेवा यांची खात्री करून घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी आमदार डॉ. किरण लहामटे यांचा जिल्हा बँकेसाठी उमेदवारी अर्ज!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शेतकरी आणि सर्वसाम ान्यांच्या हितासाठी सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही नवी जबाबदारी स्वीकारत असल्याचे त्यांनी सांगितले.

सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्याला आर्थिक बळ मि ळावे, त्याच्या कष्टाला योग्य आधार मिळावा आणि अकोले तालुक्याच्या विकासाला अधिक गती मिळावी, यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे डॉ. लहाम टे यांनी स्पष्ट केले. सहकार क्षेत्र पारदर्शक आणि सर्वसाम ान्यांच्या हिताचे असावे, ही आपली भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्हा



बँकेतील नोकरभरतीसाठी लाखो रुपयांची मागणी होत असल्याचे ऐकून मन सुन्न होते, अशी खंत व्यक्त करत शेतकऱ्यांच्या मुलांना सम ान संधी मिळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी आणि सर्वसाम ान्यांसाठी मी हा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांचा खरोखर कळवळा असणारे किती जण या लढ्यात सोबत येतात आणि साथ देतात, हे पाहूया, असे डॉ. लहामटे म्हणाले. ही निवडणूक सहकाराच्या माध्यम ातून शेतकरी आणि सामान्य माणसाच्या विश्वासाला अधिक बळ देण्याची जबाबदारी असून, जनतेचा विश्वास, आशीर्वाद आणि साथ हीच आपली खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

# संस्था सभासद हिताला प्राधान्य देणार : पाचपुते

## सहकार महर्षी काष्टी संस्थेची शंभरावी वार्षिक सभा संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी काष्टी संस्थेत पूर्वी सभासदांना कर्जवाटप साडेचार ते साडे सहा कोटी वाटप होते. तेच कर्जवाटप आपण सत्तेवर आल्यापासून साडे चार वर्षात संस्थेचा कारभार पहाताना साडे दहा कोटी पर्यंत नेवून शेतकरी सभासद हिताला प्राधान्य दिले असल्याचे सहकार महर्षी काष्टी संस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते यांनी बोलताना सांगितले.

दि.३० सप्टेंबर रोजी राज्यात अग्रगण्य असणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यातील सहकार महर्षी काष्टी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची शंभरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सहकार सभागृहात सस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुण, दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली अर्पन करुण सचिव गणेश पाचपुते यांनी अहवाल वाचन केले.

यावेळी संस्थेचे मार्गदर्शक जेष्ठ नेते कैलासराव पाचपुते, जिल्हा लेबर फेडरेशनचे संचालक अनिलमामा पाचपुते, संस्थेचे उपाध्यक्ष शहाजी भोसले, माजी अध्यक्ष ड.विठ्ठलराव काकडे, राम पाचपुते, भास्कर जगताप, अशोक पाचपुते, काशीनाथ काळे,सुभाष पाचपुते, प्रकाश पाचपुते, संभाजी कोकाटे, बंडू जगताप यांच्यासह मान्यवर पदाधिकारी हजर होते.

यावेळी अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते म्हणाले कि संस्थेला यावर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून संस्था हे शताब्दी वर्ष साजरे करणार आहे. तसेच स्पर्धेच्या काळाबरोबर आपल्याला चालायचे असेलतर संस्थेमध्ये काही बदल करणे गरजेचे आहे. यासाठी आपण संस्थेच्या जागेत २ हजार ४०० मेट्रिंक टनाचे दोन गोडावून उभे करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. भोवतालच्या गावात स्थानिक बाजारपेठ वाढल्याने आपल्याकडे ग्राहक कमी झाले. पण बाजारपेठेवर नियत्रंण ठेवण्याचे काम आपली संस्था करित आहे. सहकारी संस्था असल्याने आपल्याला जीएसटी बीले लागतात तसे खाजगी दुकानदार यांना नियत्रंण नसते. सभासद हितासाठी नगर येथील साईदिप हॉस्पीटल यांची ओपीडी सुरु केली आहे.मेडिकल वगळता संस्थेचे सर्व विभाग चांगले सुरु आहे. तरी येणारा दसरा,दिवाळी सनासाठी आपण सभासदांना संस्थेच्या वेगवेगळ्या विभागातून विशेष सवलत देऊन सभासदांची दिवाळी गोड करणार आहे. हि संस्था आपली आहे, ती टिकली पाहिजे यासाठी प्रत्येक सभासदांनी लागणाऱ्या



### चौंकटः संस्थेचे नामकरण होणार

१९२६ साली स्थापन झालेल्या सहकार महर्षी काष्टी विविध कार्यकारी सेवा सोसायटी ला २०२६ मध्ये सुमारे शंभर वर्षे पूर्ण होत आहे. संस्थेच्या जडणघडणीत जेष्ठ नेते शिवरामआण्णा पाचपुते यांचे मोठे योगदान आहे.

त्यामुळे सहकार महर्षी स्व.शिवरामआण्णा दशरथ पाचपुते विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी असे नामकरण करावे अशी सुचना सभासद बबनराव पिंपळे यांनी मांडली त्यांना सर्व सभासदांनी एकमुखी

वस्तु आपल्या संस्थेतून खरेदी कराव्यात असेही आवाहन पाचपुते यांनी केले. यावेळी प्रा.सुनील माने,संजय काळे,मोहन खोडदे पोपट भिमराव पाचपुते, नवनाथ कोकाटे, शिवाजी काकडे,बाबाजी उरमुडे,बबन पिंपळे या सभासदांनी संस्था हिताच्या सुचना मांडल्या त्यांना अध्यक्षांनी समाधानकारक उत्तरे दिली.

संचालक प्रा.सुनील म ाने यांनी सुत्रसंचालन करुण संचालक सर्जेराव पाचपुते यांनी सर्वाचे आभार मानले.

# कुमशेत येथे कचरा घंटागाडी , शाळेच्या दोन खोल्या व पाण्याचा फिल्टर प्लॅट : पं. सं .स. मोरे व जि. प .स. तांबे

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

ग्रामदैवत आई तुळजाभवानी पलंग यात्रा उत्सव निमित्त कुमशेत येथे अवघ्या काही महिन्यातच गावाला घंटागाडी दिली आहे . आपल्या हाताम ध्ये अजून साडेचार वर्ष विकाससाठी आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या उल्का मोरे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले.

जिल्हा परिषद प्राथमि क शाळा कुमशेत येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नवीन शाळेच्या दोन खोल्या वर्ग व शाळेला पाण्याचा फिल्टर प्लॅट यानिमित्ताने दिला आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले.

याप्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना नेते बबन थोरात , शिवसेना पक्ष सचिव विकास थोरात , जि. प. स. गुलाब पारखे , भाजप जिल्हाध्यक्ष गणेश कवडे , पी एस आय सोनल डोके ,सरपंच रवींद्र डोके , ग्रामपंचायत सदस्य अंबादास डोके , उपशिक्षक श्याम लालोपोड यांनी यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या.

आई तुळजाभवानी पंलगाचे आगमन दु. ४ वा . ढोल ताशाच्या गजर , फटाक्यांची आदेशबाजी, आई राजा उदो उदो... तुळजापूर भवानी माते की जय.. अशा विविध ग्रामस्थांनी व भक्तांनी घोषणा देत जोरदार आगमन झाले.

पिंपळाच्या झाडाजवळ



भाविक भक्तांनी हार, फुले विणी , फुलांची चादर व पूजा विधी संपन्न केली. यावेळी जय अंबिका प्रसादिक भजनी मंडळ यांनी टाळ मृदुंग विना हातात घेऊन भाविक भक्तांनी अभंग सादर केले. ग्रामदैवत हनुमान मंदिर येथे सायं . ७ वा .आई तुळजाभवानी मातेला नैवेद्य , आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद रात्री ८ वा ., रात्री ९ वा . छबिना मिरवणुक , रात्री १० . ३० वा . सांगा ना कशी दिसते मी स्वरांजली कला मंच पुणे निर्मित यांचा आर्केस्ट्रा मनोरंजनचा कार्यक्रम हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

# काटकसर, शिस्त अन् नियोजन; 'जगदंबा'ची ३० वर्षांची यशोगाथा!

## देवीभोयरेच्या जगदंबा सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात; संचालक मंडळाच्या कार्यपद्धतीचे कौतुक

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

देवीभोयरेसारख्या छोट्या गावात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेल्या जगदंबा सहकारी पतसंस्थेने काटकसरीचा कारभार, आर्थिक शिस्त आणि योग्य नियोजनाच्या जोरावर तीन दशकांचा यशस्वी टप्पा पूर्ण केला. संस्थेच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या वाटचालीचा गौरव करण्यात आला. संस्थेचे चेअरमन तुकाराम बेलोटे यांच्या अध्यक्षतेखाली सभा उत्साहात पार पडली.

सभेच्या प्रारंभी संस्थेचे मॅनेजर रावसाहेब वाढवणे यांनी मागील आर्थिक वर्षाचा अहवाल सादर केला. खर्च, नफा, ठेवी आणि आर्थिक व्यवहारांसह १८ विषय सभेसमोर मांडण्यात आले. सभासदांनी टाळ्यांच्या गजरात सर्व विषयांना मंजुरी दिली.

चेअरमन तुकाराम बेलोटे यांनी संस्थेच्या तीन दशकांच्या प्रवासाचा आढावा घेताना आर्थिक व्यवहारात शिस्त आणि काटकसरीचे नियोजन यावर भर दिला. कर्जदार सभासदांनी वेळेत कर्जाची परतफेड करून संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामपातळीवर गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याची परंपरा असली, तरी विद्यार्थ्यांनीही या सन्मानाला उपस्थित राहण्याबाबत गांभीर्य दाखवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

व्हाईस चेअरमन शिवाजीराव बेलोटे यांनी जगदंबा पतसंस्था ही गावाचे भूषण असल्याचे सांगितले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेल्या संस्थेने ३० वर्षांचा टप्पा पूर्ण केला असून, तालुक्यातील काही सहकारी संस्था बंद पडत असताना जगदंबा पतसंस्थेने शिस्तबद्ध कारभाराच्या जोरावर आपली वाटचाल कायम ठेवली, असे त्यांनी नमूद केले.

पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाषराव बेलोटे यांनी संचालक मंडळाच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. सरपंच अशोकराव मुळे यांनी संस्थेने गावाच्या विकासासाठी केलेल्या कामांचा उल्लेख




करून गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या शाळेत जाऊन गौरव करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ लक्ष्मण गाजरे यांनी संस्थेच्या आर्थिक व्यवस्थापनाचे कौतुक केले. केवळ ठेवींचे प्रमाण नव्हे, तर आर्थिक नियोजन, व्यवहारातील शिस्त आणि संस्थेचा एकूण कारभार या बाबी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ च्या कलम ११ अन्वये नोटीस.
दूरध्वनी: ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक: ४४/२०२६-२७/३०१७**
**पुणे, दिनांक: ३०/०९/२०२६**

सुविधा रो-हाऊस को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.
स.नं. २६९/२/१, कोल्हेमळा, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, ४१०५०४
तर्फे श्री. किरण चंद्रकांत जाधव (अध्यक्ष) .......**अर्जदार**

**विरुद्ध .........** मे. श्री डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. १) श्री. शिरीष प्रभाकर जठार (विकासक) २) श्री. सुभाष यशवंत कावळे (विकासक) ३) श्री. बाळासाहेब शंकर भास्कर (जागा मालक) ४) श्री. हेमंत बापु डोके (जागा मालक) सर्व रा. कोल्हेमळा, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, ४१०५०४....**जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप क्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. **सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की**, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक १९/१०/२०२६ रोजी दुपारी ४.00 वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**(प्रकाश ल. जगताप)**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामिण यांचे कार्यालय**
**५, बी. जे. रोड, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, पुणे ४११ ००१.**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये
दूरध्वनी: ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये**
**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक २१/२०२६-२७/३०१६
दिनांक-३०/०९/२०२६

नियोजित गौसिया कॉम्प्लेक्स को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
पत्ता- सि.स.नं.४४८७/२, पणसुंबापेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे-४१०५०२
तर्फे श्री. रफिक कासिम शेख (मुख्य प्रवर्तक) .......**अर्जदार**

**विरुद्ध .........**श्री. मोहम्मद अकील मोहम्मद शफी सय्यद (विकासक)
रा. माई मोहल्ला, जुन्नर, ता. जुन्नर, ४१०५०२ ........**जाबदेणार**

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक १९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही. असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(प्रकाश ल. जगताप)**
ठिकाण - पुणे **सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**दि. ३०/०९/२०२६** **सहकारी संस्था, पुणे, ग्रामीण पुणे**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामिण यांचे कार्यालय**
**५, बी. जे. रोड, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, पुणे ४११ ००१.**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये
दूरध्वनी: ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये**
**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक २०/२०२६-२७/३०१८
दिनांक-३०/०९/२०२६

नियोजित समृध्द को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
पत्ता : सि.स.नं.८०७ ते ८११, पेठ आळी, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४
तर्फे श्रीमती. शारदा दिलीप माने (मुख्य प्रवर्तक) .......**अर्जदार**

**विरुद्ध .........**मे. समृध्द क्रिएटर्स तर्फे प्रोप्रा. १) श्री. रवि सोमजीभाई पटेल (विकासक), रा. नारायणगाव, ता. जुन्नर, ४१०५०२ ........**जाबदेणार**

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक १९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही. असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(प्रकाश ल. जगताप)**
ठिकाण - पुणे **सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**दि. ३०/०९/२०२६** **सहकारी संस्था, पुणे, ग्रामीण पुणे**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या सुरेखा मातनेची विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धे साठी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

शेवगाव येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची लाँग डिस्टन्स रनर सुरेखा मातने हिने उल्लेखनीय कामगिरी करत नाशिक येथे होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. सुरेखा मातने हिने यापूर्वीही विविध हाफ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेतही तिने चांगली कामगिरी करत आपल्या क्रीडा कौशल्याची छाप पाडली आहे. सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या निवडीबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राहुलदादा जगताप, महावीर पटवा, प्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. सुरेखा मातने हिला शारीरिक शिक्षण संचालक प्रा. कल्पना बागुल आणि क्रीडा शिक्षक संजय डफळ यांचे मार्गदर्शन लाभले.

### हिराबाई चव्हाण यांचे दुःखद निधन

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रहिवासी माजी ग्रामपंचायत सदस्या श्रीमती हिराबाई रमेश चव्हाण यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ८० वर्षे वयाच्या होत्या.त्यांच्या मागे दोन मुल,तीन मुली,सुना,नातवंड, जावई,असा मोठा परिवार आहे. काष्टी येथील गणेश इंजिनिअरिंगचे मालक महादेव चव्हाण व गणेश फर्निचरचे मालक गणेश चव्हाण यांच्या त्या मातोश्री होत्या.अतिशय प्रेमळ मनमिळावू आणि समाजासाठी एक आदर्श मार्गदर्शक माता होत्या त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होते.

### नाशिक-पुणे रेल्वेबाबत केंद्रसरकार सकारात्मक.! : खास. भाऊसाहेब वाकचौरे



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुका रेल्वे कृती समिती व अकोले तालुका ग्राहक पंचायतीच्या वतीने नाशिक-पुणे हायस्पीड मूळ संकल्पित मार्गानेच व्हावी याबाबतचे निवेदन आज अकोले तहसिल कार्यालयात शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना देण्यात आले सदर प्रसंगी अकोल्याचे तहसीलदार श्री. सिद्धार्थ मोरे हे उपस्थित होते.सध्या चर्चेत असलेल्या नाशिक,सिन्नर, देवठाण, संगमनेर, नारायणगाव पुणे हायस्पीड रेल्वेमार्ग बाबतची स्थानिक पातळीवर जनसुनवणी घेण्यासंदर्भातील काकोडकर समितीची मुदत संपली असल्याने व सदर समिती सदस्य अद्यापही फिरकले नसल्याने अकोले तालुका रेल्वे कृती समितीने खासदारांची भेट घेतली.यावेळी खासदार वाकचौरे म्हणाले की,केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैश्नव यांची नुकतीच मी भेट घेतली असुन या संदर्भात त्यांनी नाशिक पुणे हायस्पीड रेल्वेमार्गा बाबत सकारात्मक भूमिका मांडली व सदर रेल्वेमार्गाबाबत येणाऱ्या अडचणी राज्यसरकारच्या आखत्यारीतील असुन सदर अडचणीबाबत राज्यसरकारने पुढील कार्यवाही करावी अशी भूमिका मांडली. याप्रसंगी नाशिक, पुणे, अहिल्यानगरच्या रेल्वे कृती समितीचे सदस्य, पत्रकार भाऊसाहेब वाकचौरे, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, जेष्ठ नेते माधवराव तिटमे, कवी ज्ञानेश पुंडे, राम रुद्धे, रामदास पांडे, इंजिनियर वसंतशेठ बाळसराफ, अॅड. राम भांगरे, सेवानिवृत्त प्राचार्य आदिनाथ सुतार सर, कारभारी बंदावणे,नारायण जगधणे, सौ. सुमनताई जाधव, पांडुरंग पथवे, बबनराव तिकांडे, जालिंदर घोडके,दत्ता शेणकर,भाऊसाहेब आभाळे, यांच्यासह विविध नागरिक उपस्थित होते.

### महिलांचे दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघे जेरबंद

मंचर (समर्थ गांवकरी)

मंचर बसस्थानक परिसरात गर्दीच्या ठिकाणी महिलांच्या अंगावरील व पिशवीतील दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील दोघांना आणि सोने खरेदी करणाऱ्या एकाला मंचर पोलिसांनी जेरबंद केले.आरोपींकडून चोरीच्या सोन्याच्या दागिन्यांसह एकूण ४ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मंचर बसस्थानकात बसण्यासाठी चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन महिलांचे दागिने चोरीस जाण्याच्या घटना वारंवार घडत होत्या.या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.शुभम कुमार,उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या सूचनेनुसार पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली.गुन्ह्यातील आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध घेत असताना २४ सप्टेंबर रोजी आरोपी मंचर बसस्थानकात आल्याची माहिती मिळाली.

# जामखेड दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागाकडून कार्यवाही

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील शेतकऱ्यांच्या बांधावर!







जामखेड (समर्थ गांवकरी)

**दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन; कुकडीच्या आवर्तनाबाबत सकारात्मक निर्णयाची ग्वाही!**

टंचाईच्या परिस्थितीला सामोरे जाताना प्रशासकीय यंत्रणेने संवेदनशीलपणे काम करावे. कोणताही नियम अथवा कायद्याची अडचण सांगून शेतकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण करू नये. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून जामखेड तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागाने महत्त्वपूर्ण निर्णयांची कार्यवाही सुरू केली आहे. कुकडी धरण समूहातील पाण्याचा लाभ आवर्तनाच्या माध्यमातून देण्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल, अशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मंत्री विखे पाटील यांनी जामखेड तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. अरणगाव येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पावसाअभावी नुकसान झालेल्या शेतीपिकांची पाहणी करत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. कर्जत-जामखेड तालुक्यातील दुष्काळी भागातील प्रश्न जाणून घेण्यासाठी सभापती प्रा. राम शिंदे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार सुनील कर्जतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगराध्यक्षा प्रांजली चिंतामणी, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व शेतकरी उपस्थित होते. दुष्काळी भागाला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जलदगतीने निर्णय घेण्यात आले असून जनावरांसाठी चारा व पाण्याचे नियोजन प्राधान्याने करण्याच्या सूचना विखे पाटील यांनी दिल्या. सर्व नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. टँकर नियोजनासाठी ग्रामसेवक व तलाठ्यांची उपस्थिती सक्तीची करावी, तसेच सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती देऊ नये, हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कवडगाव, चौंडी व जवळा येथील कोल्हापूर बंधाऱ्यांची कामे, मोहरी तलावाचा सांडवा तसेच कुकडी कालव्यांच्या नुकसानग्रस्त भागांच्या दुरुस्तीसाठी जलसंपदा विभागाने निधी उपलब्ध करून दिला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी जामखेड तालुक्याला मिळावे, अशी अपेक्षा सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केली. पीकविमा, वीज आणि जलजीवन मिशनच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाने अधिक गांभीर्याने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

अकोले (समर्थ गांवकरी)



शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त अकोले शहरासह तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्या, पेन व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

अकोले शहरातील मॉर्डन हायस्कूल ज्युनिअर कॉलेज, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित मुळा परिसरातील भैरवनाथ हायस्कूल ज्युनिअर कॉलेज तसेच पिंपळगाव नाकविंदा, आढळवाडी, सोंगाळवाडी आणि पिंपळगाव खांड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

यावेळी विविध ठिकाणी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष विकासराव शेटे, इंजि. सागर शेटे, बाळासाहेब शेटे, इंजि. विशाल शेटे, बाबाजी शेटे, अमोल वाल्हेकर, गुणरत्न साळवे, तुकाराम घोडेकर, सोनाली शेटे, नर्गिज साळवे, वाळिबा लगड, गणेश बगनर, मुख्याध्यापक कचरू बेणके, विष्णू भांगरे, गणपत मुठे, बाळू धिंदळे, समता कराळे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावणाऱ्या या उपक्रमाचे शिक्षक, पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समित्यांच्या वतीने कौतुक करण्यात आले. डॉ. विश्वासराव आरोटे व प्रा. सचिन लगड यांचे यावेळी आभार मानण्यात आले.

## जिल्हा बँकेच्या बिगरशेती मतदारसंघातून भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांचा अर्ज दाखल

### पतसंस्थांच्या प्रश्नांसाठी जिल्हा बँकेत लढणार : वसंत लोढा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३१ साठी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी बिगरशेती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. जिल्हा मध्यवर्ती बँक सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याकडे त्यांनी अर्ज सादर केला.

यावेळी माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा पतसंस्था स्थैर्य निधीचे अध्यक्ष शिवाजीराव कपाले, पाथर्डी तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष उमेश मोरगावकर, सुनील रामदासी,भानुदास बेरड,अभय आगरकर,सचिन पारखी,पंडित दीनदयाळ नागरी संस्थेचे संचालक मिलिंद गंधे,अनंत होशिंग,बाबासाहेब साठे, सुधीर पगारिया,विकास पाथरकर,जैन ओसवाल नागरी पतसंस्थेचे चेअरमन पितळे,संचालक संतोष गांधी,रामकृष्ण पतसंस्थेचे संचालक विश्वनाथ कासट, बाळासाहेब भुजबळ, सुधीर मुळे,उमेश मेरगु,नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे व्यवस्थापक महेश जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी शिवाजीराव कपाले म्हणाले,वसंत लोढा यांनी गेल्या ३० वर्षांपासून जिल्ह्यातील पतसंस्थांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी लढा दिला आहे.पतसंस्था चळवळीतीलच प्रतिनिधी संचालक म्हणून जिल्हा बँकेत निवडून द्यावा,यासाठी सर्व पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे.

वसंत लोढा म्हणाले, जिल्हा बँकेत साडेअकरा हजार कोटी रुपयांच्या ठेवींपैकी ३० टक्के ठेवी जिल्ह्यातील पतसंस्थांच्या आहेत. पतसंस्थांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा बँकेत स्वतंत्र कक्ष असावा. पतसंस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांचे प्रतिनिधित्व म्हणून ही उमेदवारी केली आहे.

## साप समजून घ्या, निसर्ग वाचवा; वन्यजीव सप्ताहात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

मवेशी (समर्थ गांवकरी)





सापांविषयी समाजात असलेली भीती, गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करून वन्यजीवांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज असल्याचे सर्पमित्र सचिन गिरी यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या वतीने आयोजित वन्यजीव सप्ताह २०२६ अंतर्गत मवेशी संकुलात सर्प जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गिरी यांनी विद्यार्थ्यांना सापांच्या विविध प्रजाती, त्यांचे अधिवास, विषारी व बिनविषारी साप आणि सर्पदंशाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

साप हा निसर्गातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा दुवा आहे. उंदीर आणि इतर पिकनुकसान करणाऱ्या जीवांची संख्या नियंत्रणात ठेवण्यात सापांची भूमिका असल्याने शेतीच्या दृष्टीनेही त्यांचे महत्त्व आहे. त्यामुळे सापांना घाबरून त्यांना मारण्याऐवजी त्यांच्या पर्यावरणीय भूमिकेची माहिती करून घेणे आवश्यक असल्याचे गिरी यांनी स्पष्ट केले.

साप दूध पितात, सूड घेतात, माणसाला ओळखून ठेवतात यांसारख्या अनेक गैरसमजुती समाजात प्रचलित आहेत. अशा समजुतींना शास्त्रीय आधार नसल्याचे सांगत गिरी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. साप आढळल्यास त्याला त्रास देऊ नये किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सुरक्षित अंतर ठेवून प्रशिक्षित सर्पमित्रांची मदत घ्यावी. सर्पदंश झाल्यास कोणत्याही अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने श्री स्वामी समर्थ विद्यालय, मवेशी येथेही सर्प जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सापांविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

मवेशी संकुलातील कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे, वनपाल आर. एस. घोडसरे, वन विभागाचे सर्व कर्मचारी, केंद्रप्रमुख भांगरे सर, पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्यासह मवेशी संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच आयटीआयचे विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रा.सचिन पुराणे यांना इंग्रजी विषयात डॉक्टरेट 'पीएचडी' पदवी प्रदान

### प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी !

मिरजगाव (समर्थ गांवकरी)





कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा येथील सुपुत्र प्रा.सचिन रामचंद्र पुराणे सर यांनी इंग्रजी विषयात केलेल्या संशोधनाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडची 'डॉक्टरेट' पीएचडी पदवी प्राप्त केली आहे.

प्रा.सचिन पुराणे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, आपल्या बुद्धिमत्तेच्या व सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत, जिद्दीच्या आणि अथक परिश्रमाच्या जोरावर इंग्रजी विषयात डॉक्टरेट ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी संपादन करून आपल्या यशाची नवी उंची गाठली आहे. त्यांच्या या यशामुळे बाभुळगावकरांच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांचे हे यश केवळ वैयक्तिक कर्तृत्व नसून बाभुळगाव खालसा गावासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशातून गावातील विद्यार्थी, तरुण आणि पुढील पिढीला निश्चितच प्रेरणा मिळेल. त्यांच्या या यशात कुटुंबीय तसेच संशोधन मार्गदर्शकांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेषतः त्यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून, परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाची जिद्द आणि मेहनत असेल तर यशाचे शिखर गाठता येते, हे त्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.

डॉ.प्रा.सचिन पुराणे यांनी डॉक्टरेट पदवी प्राप्त केल्याबद्दल बाभुळगावकरांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## मिरजगाव येथे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचा दिमाखदार समारोप

### कुस्ती, वजन उचलणे व शरीरसौष्ठव स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

मिरजगाव (समर्थ गांवकरी)

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन सद्गुरु कृषि महाविद्यालय, मिरजगाव येथे करण्यात आले होते.

या स्पर्धांच्या आयोजनामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीचे अधिष्ठाता डॉ. सताप्पा खरबडे आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी यांचे मार्गदर्शन लाभले.

सद्गुरु कृषि महाविद्यालय, मिरजगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या आंतरमहाविद्यालयीन कुस्ती, वजन उचलणे आणि शरीरसौष्ठव स्पर्धांचा दिमाखदार समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला. विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या क्रीडा कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांसह प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभासाठी कर्जतचे पोलिस उपअधीक्षक सुजित कुमार क्षीरसागर, उपविभागीय कृषी अधिकारी किरण मांगडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी व संचालक डॉ. विलास आवारी, डॉ. भानुदास राठोड, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी शरद पाटील, माजी क्रीडा अधिकारी दिलीप गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पदके, प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली.

कुस्ती स्पर्धेत विविध वजनी गटांमध्ये चुरशीची लढत झाली. ५७ किलो वजनी गटात लेकुरवाळे शिवम, ६१ किलोमध्ये पवार स्वप्निल संदीप, ६५ किलोमध्ये जाधव ओम भाऊसाहेब, ७० किलोमध्ये पवार सुजल विशाल, ७४ किलोमध्ये धोदाड यश महेंद्र कुमार, ७९ किलोमध्ये सुतार युवराज संदीप, ८६ किलोमध्ये हिपरकर अथर्व मदप्पा, ९२ किलोमध्ये गंभीरे स्वराज संजय कुमार, ९७ किलोमध्ये मस्के मोहित विठ्ठल आणि १२५ किलो वजनी गटात होळकर श्रीधर नथुराम यांनी सुवर्णपदक पटकावले. तसेच कुस्ती मधील जनरल चॅम्पियनशिप एग्रीकल्चर कॉलेज बारामतीच्या संघाने पटकावली.

विविध गटांमध्ये थोरात तेजस विश्वास, वाकशे ओंकार संतोष, शिंदे शिवतेज ज्ञानदेव, डोके यशोधन रावसाहेब, पवार सिद्धेश विक्रमसिंह, पासले इंद्रजीत रामचंद्र, हैनल रोनीत राज शेखर, सूर्यवंशी संजय महेश, कांबळे सागर बाळासाहेब आणि मार्कड सुजित सुधीर यांनी रौप्यपदक, तर राजगे अथांग आबासाहेब, पवार शिवम मच्छिंद्र, जवळगे सूरज नागनाथ, दळवी वैभव प्रमोद, फडतरे वेदांत उद्धव, चोरमले आदेश बाबासाहेब, माने पृथ्वीराज नंदू, शेख आरमान जावेद, माळी विक्रांत युवराज आणि चेमटे शुभम सहदेव यांनी कांस्यपदक मिळविले.





या सर्व विजेत्या खेळाडूंची मोहाली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी निवड झाली असून या सर्व खेळाडूंना मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

शरीरसौष्ठव स्पर्धेत ६० किलो वजनी गटात रेडे मंथन दादा, ६५ किलोमध्ये भोसले रोहित, ७० किलोमध्ये अमन जाधव, ७५ किलोमध्ये रोहित चव्हाण, ८० किलोमध्ये गाडेकर यश, ८५ किलोमध्ये चव्हाण अविनाश, ९० किलोमध्ये शिंदे संजीव राजे आणि ९० किलोपेक्षा अधिक वजनी गटात मेघराज गायकवाड यांनी सुवर्णपदक पटकावले. शरीर सौष्टव स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी 'श्री' चा मान बारामती कॉलेजच्या विद्यार्थी अमन जिजाबा जाधव याला मिळाला.

# पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य; जामखेडसाठी उजनीचे अतिरिक्त पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न

**दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाने गावोगावी जाऊन काम करावे; पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील**

**दुष्काळात नागरिकांना पाणी आणि हाताला काम देण्यासाठी परिपूर्ण नियोजन करा : विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे**










अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असून, जामखेड तालुक्यासाठी उजनी धरणातील अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. सध्या उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून नागरिक, शेती आणि पशुधनाच्या गरजा लक्षात घेऊन उपाययोजना करण्यात येतील. दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पाणी आणि हाताला काम उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागांचा समन्वय साधून परिपूर्ण दुष्काळ निवारण आराखडा तयार करण्याचे निर्देश विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी दिले.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत व जामखेड तालुक्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती तसेच चारा व पाणीटंचाईबाबत आढावा व नियोजन बैठक जामखेड येथे झाली. विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, आमदार सुनील कर्जतकर, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करा**

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, कर्जत आणि जामखेड तालुक्यातील अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे तत्काळ पूर्ण करावीत. उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य द्यावे. गावागावातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी उपाययोजना कराव्यात.

पशुधनासाठी चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन करावे. पहिल्या टप्प्यात डिसेंबरपर्यंत आवश्यक असलेल्या चाऱ्याचे नियोजन पूर्ण करावे. दुष्काळामुळे नागरिकांचे स्थलांतर होऊ नये, यासाठी रोजगाराच्या कामांची संख्या वाढवावी. रोजगाराच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर नागरिकांना काम उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे**

दुष्काळ तसेच शेतीच्या नुकसानीच्या परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतीचे सरसकट पंचनामे करण्यात येणार असून कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या वीज खांबांची तसेच डीपीची कामे महावितरणने तातडीने पूर्ण करावीत. दुष्काळाच्या परिस्थितीत वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

**अधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन समस्या जाणून घ्याव्यात**

दुष्काळाच्या परिस्थितीत अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये. गावागावात भेटी देऊन शेतकरी व नागरिकांशी संवाद साधावा आणि त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तत्काळ उपाययोजना कराव्यात. कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पालकमंत्र्यांनी दिला.

**पाणी आणि रोजगाराचे नियोजन आवश्यक – प्रा. राम शिंदे**

विकसित भारत – रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण)' योजनेअंतर्गत कामांची व्याप्ती वाढवून अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून द्यावा. जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत. पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांना थेट डीबीटीद्वारे निधी देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. गावागावातील मागणीनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असे निर्देश विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी दिले.

**नागरिकांना आवश्यक सुविधा देण्यावर भर**

विधान परिषद सदस्य सुनील कर्जतकर म्हणाले, दुष्काळी परिस्थितीत शासन संवेदनशीलपणे काम करीत असून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबरोबरच पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात.

बैठकीत कर्जत व जामखेड तालुक्यातील पाणीपुरवठा, चारा, रोजगार, वीजपुरवठा, अपूर्ण पाणीपुरवठा योजना आणि दुष्काळ निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### दुष्काळग्रस्त यादीत नाव नसले तरी अणे पठारावर दुष्काळाचे संकट

**सोयाबीन पिके करपली!**

अणे पठार/पुणे (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्याच्या पठार भागातील अनेक गावांमध्ये पावसाअभावी शेती संकटात सापडली आहे. पावसाच्या आशेवर शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली; मात्र आवश्यक पाऊस न झाल्याने पिके करपून गेली आहेत. त्यामुळे उत्पादनाची अपेक्षा मावळली असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. विशेष म्हणजे दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत या भागाचा समावेश नसल्याने प्रत्यक्षात



दुष्काळसदृश परिस्थिती असतानाही शेतकऱ्यांना दुष्काळी सवलतींचा लाभ मिळणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. उशिरा परतीचा पाऊस झाला तरी हातातून गेलेल्या सोयाबीन पिकाला त्याचा फारसा फायदा होणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पावसाअभावी शेती उत्पादन घटल्याने त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नाबरोबरच स्थानिक बाजारपेठ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ तालुकानिहाय नव्हे, तर गावनिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी अणे पठार परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

### शिवसेनेकडून वडार समाजाचे मारुती विटेकर यांचा सत्कार संपन्न




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

येथील शिवसेनेच्या संपर्क कार्यालयात वीर वडार एकता फाउंडेशन या राज्यस्तरीय संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी शिवसेनेचे मारुती विटेकर यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आज नगर दक्षिण उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी उपतालुकाप्रमुख अंबादास कलापुरे,नंदीवाले तिरमली समाजाचे जिल्हाप्रमुख बाबू काकडे, शिवसैनिक अशोक दळवी ,विकास काळे, वसंत गिरे, ऋषिकेश हराळ, नितीन कुसाळकर ,श्रीकांत पाटोळे ,बबनराव कर्डिले आदींसह अनेक जण उपस्थित होते.वीर वडार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय दादा गोरे यांनी नुकतेच मारुती विटेकर यांना जिल्हाप्रमुख पदी नियुक्तीचे पत्र दिले आहे त्याबद्दल आज हा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना आनंदराव शेळके म्हणाले मारुती विटेकर हे पहिल्यापासून शिवसैनिक होते व आजतागायत आहे, त्यांनी कोणता पक्ष बदलला ना कोणती संघटना आजपर्यंत ते पडद्यामागे राहून काम करत होते. आता ते वडार समाजाचे जिल्हाध्यक्ष झाल्याने समाजाला नक्कीच न्याय मिळणार आहे.मारुती विटेकर म्हणाले वीर वडार एकता फाउंडेशनचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली. याबद्दल सत्कार होत आहे पण आजचा हा सत्कार घरचा आहे त्यामुळे खुप आनंद होत आहे, मी त्यासाठी जनसंपर्क कार्यालय सुरु केले आहे.वडार समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी मी कायम सक्रिय राहणार आहे. समाजाच्या हक्कासाठी आणि वीर वडार एकता फाउंडेशनचे कार्य तळागाळातील बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध असणार असल्याचे स्पष्ट केले.

## शेठ नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील आढळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव पाट येथिल विद्यार्थ्यांना शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.




या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.मुख्याध्यापक – राजेंद्र सदगीर

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष – दशरथ सहाणे

सुलक्षण सहाणे – पालक बाळासाहेब सहाणे सर – प्रतिष्ठीत ग्रामस्थ

शिक्षक .– भगवान सहाणे सबाजी दातीर बाळासाहेब मुखेकर श्री डगळे परिगा उगले राजकमल नवले

k G शिक्षिका – श्रीम पवार आदी उपस्थित होते

## आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**कर्जत-जामखेडमधील तरुण-तरुणींना रोजगाराची संधी**

कर्जत (समर्थ गांवकरी)

कर्जत – जामखेड मतदार संघातील तरुण-तरुणींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आमदार रोहितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

बारामती ग्रो लिमिटेड व कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग यांच्या सहकार्याने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

कर्जत-जामखेड मतदारसंघातील युवकांना रोजगाराच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध औद्योगिक क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामुळे स्थानिक तरुणांना आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी मिळणार असून, पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



या रोजगार मेळाव्याचे आयोजन कर्जत येथे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दादा पाटील महाविद्यालय येथे, तर जामखेड येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागेश विद्यालय व कन्या विद्यालय येथे करण्यात आले आहे.

दहावी, बारावी उत्तीर्ण, कोणत्याही ट्रेडमधील आयटीआय, विविध पदविका अभ्यासक्रम तसेच इ.डल., इ.ऊे. आणि इ.. पदवीधारक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या ३ ते ४ प्रती, सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व ओळखपत्र सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जत-जामखेडमधील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घेऊन रोजगाराची संधी मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६'मधून आरोग्यसेवेचा जागर

**कामगारांसह नागरिकांची आरोग्य तपासणी**




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (चणक्ख) निर्देशानुसार 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या अभियानांतर्गत साईनाथ उद्योग इंडस्ट्रीज, अहिल्यानगर येथे कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कामगारांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच श्रमिकनगर येथील मल्लेशम येमुल आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

अभियानाच्या माध्यमातून आरोग्य तपासणीसोबतच नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. योग्य व संतुलित आहार, नियमित व्यायाम, आरोग्यदायी जीवनशैली, आजारांपासून बचावासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरात सहभागी नागरिकांच्या आरोग्यस्थितीनुसार आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. 'निरोगी समाज, सुदृढ कुटुंब' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून समाजातील विविध घटकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न या अभियानातून करण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी अभियानात सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मार्गदर्शन लाभले.

वैद्यकीय सेवा संचालक ब्रिगेडियर डॉ. अरुण त्यागी (सेवानिवृत्त), प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रसाद काजळे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय व सामाजिक सेवा पथकाने उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय समाजकार्यकर्ता संतोष साळवे, निलेश बनसोडे आणि करण ढोकणे यांनी शिबिराच्या नियोजन, समन्वय व आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्या व विभागप्रमुख डॉ. योगिता औताडे यांच्या समन्वयातून अमोल अनाप, राहुल कडू, विशाल पुलाटे, दिनेश मगर, प्रिती कडू यांच्यासह विद्यार्थ्यांनी अभियानाच्या नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

# शेळावे गणातील दुष्काळी प्रश्नांसाठी प्रशासनाकडे निवेदन

**पाणी, पीकनुकसान भरपाई, चारा व रोजगाराच्या तातडीच्या उपाययोजनांची मागणी**

पारोळा (समर्थ गांवकरी)

शेळावे गणातील गावांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर, पशुपालक व विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंत्री यांना तहसीलदार, पारोळा यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

शेळावे गणातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई, शेतीपिकांचे नुकसान, पशुधनासाठी चाऱ्याची समस्या तसेच ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्न गंभीर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

या आहेत प्रमुख मागण्या

निवेदनात पीकनुकसानीचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा तसेच पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी आहे. पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देऊन आवश्यक त्या ठिकाणी चारा छावण्या सुरू कराव्यात, मनरेगा व रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करून स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीककर्ज पुनर्गठन व कर्जवसुलीस मुदतवाढ अथवा स्थगिती, पात्र विद्यार्थ्यांना लागू शासन निर्णयानुसार शैक्षणिक व परीक्षा शुल्क सवलत, तसेच पात्र शेतकऱ्यांना शेतीपंप व वीजसवलतींचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे, शेततळे व इतर जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

डॉ. समाधान मैराळे यांची प्रतिक्रिया

डॉ. समाधान मैराळे म्हणाले, शेळावे गणातील नागरिकांना दुष्काळी परिस्थितीचा थेट सामना करावा लागत आहे. पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांचे पीकनुकसान, पशुधनासाठी चारा आणि रोजगार हे प्रश्न नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहेत. त्यामुळे या



मागण्यांकडे केवळ कागदोपत्री न पाहता संबंधित विभागांनी तातडीने प्रत्यक्ष कार्यवाही करणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी आणि पाणी व चाऱ्यासारख्या अत्यावश्यक बाबींमध्ये विलंब होऊ नये, ही आमची प्रमुख मागणी आहे.

या निवेदनावर डॉ. समाधान मैराळे, प्रदीप पाटील, गणसिंग पाटील, गोरख भिल, शुभम पाटील, जितेंद्र पाटील, रोहिदास पाटील, मयूर पाटील, महेंद्र पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनाद्वारे शेळावे गणातील दुष्काळी प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# ‘पीएम सूर्य घर-मोफत वीज योजने’चा आ. दातेंच्या हस्ते शुभारंभ

पारनेर (समर्थ गांवकरी)

गुरुवार दि. १ आक्टोबर २०२६ केंद्र सरकारच्या ‘पीएम सूर्य घर-मोफत वीज योजना’ अंतर्गत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना सौरऊर्जेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीमेचा शुभारंभ आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते करण्यात आला. घरांवर सोलर पॅनेल बसवून वीज बिलाचा खर्च कमी करणे तसेच नागरिकांना सौरऊर्जेचा पर्याय उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत १ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत सोलर सिस्टीम बसविण्यासाठी विशेष दर व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. केंद्र सरकारच्या पीएम सूर्य घर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर सिस्टीमसाठी एकूण ₹७८ हजारांपर्यंत केंद्रीय अनुदान मिळू शकते. तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

दिलेल्या माहितीनुसार, ३ किलोवॅट सिस्टीमची विशेष किंमत ₹१ लाख ६० हजार, २ किलोवॅटसाठी ₹१ लाख १० हजार, तर ५ किलोवॅटसाठी ₹२ लाख ५० हजार अशी ठेवण्यात आली आहे. सोलर पॅनेल, इन्व्हर्टर, सर्व्हिसिंग व इतर सुविधांबाबत संबंधित विक्रेत्याकडून वॉरंटी व सेवा देण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या शुभारंभप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, भाजप नेते राहुल पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, कार्याध्यक्षा सुधामती कवाद, शहराध्यक्ष कविता औटी, उपाध्यक्ष सोनाबाई चौधरी, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, दत्ता पवार, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष राजु औटी, अपर्णा खामकर, सुनील गाडगे, उद्योजक मंगेश दाते, विठ्ठल कवाद, माउली औटी, प्रताप आंबुले, लहू भालेकर, प्रदीप नगरे, सोनाली चत्तर, बाळासाहेब सोबले, सुभाष थोरात, रोहिदास लामखडे, संजय औटी, निसार शेख, हिरामण सोनवणे, अमोल चौधरी, मधुकर जाधव, चौधरी साहेब, नियाज राजे, रामराव गाडेकर, सुभाष औटी, निलेश कटारिया, अजित पळसे, अक्षय खताळ यांच्यासह सोलार चे प्रशांत शिंदे, अनंत सिद्धेश्वर, अमोल मेडे, महेश रनवे, सुरज धाडगे हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना वीजपुरवठा तसेच लोडशेडिंगच्या समस्येबाबत नागरिकांचे वारंवार फोन येतात. त्यामुळे नागरिकांच्या या समस्येवर दीर्घकालीन पर्याय उपलब्ध व्हावा आणि वीज खर्चात बचत व्हावी, या उद्देशाने सौरऊर्जेचा पर्याय अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. सोलर संच बसविणाऱ्या संबंधितांकडून नागरिकांना योग्य मार्गदर्शन व सेवा देण्याबाबत विश्वास देण्यात आला आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी लाईट बिल, आधार कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, घरपट्टी किंवा ७/१२ उतारा तसेच वीज बिलाशी जोडलेला मोबाईल क्रमांक अशी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. नागरिकांनी सोलर संच बसविण्यापूर्वी योजनेची पात्रता, अधिकृत अनुदान, अंतिम किंमत, कर्जाच्या अटी तसेच वॉरंटी व सेवा यांची संबंधितांकडून खात्री करून घ्यावी.

या उपक्रमासंदर्भात अधिक माहितीसाठी आमदार काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे संपर्क साधावा.



**सौर सोलर घर योजना माध्यमातून सोलर प्रकल्प उभारताना संपूर्ण प्रक्रिया ग्राहकांसमोर पारदर्शक ठेवण्याला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देत आहोत. सोलर सिस्टीमची किंमत, अनुदान, कर्ज सुविधा, उपकरणांची माहिती, वॉरंटी तसेच सर्व्हिसिंग याबाबत ग्राहकांना सुरुवातीपासून स्पष्ट माहिती दिली जाईल. कोणतीही लपविलेली आकारणी न ठेवता ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार योग्य पर्याय उपलब्ध करून देणे आणि स्थापनेनंतरही सेवा-सपोर्ट देणे, ही आमची जबाबदारी आहे. ग्राहकांचा विश्वास आणि समाधान हीच आमच्या कामाची खरी पारदर्शकता आहे.**

**– प्रशांत शिंदे**

# आमदार सत्यजित तांबे यांनी घेतली भारतरत्न सचिन तेंडुलकर यांची भेट

## अजिंक्य रहाणे, झहीर खान यांच्या समवेत चर्चा

संगमनेर (समर्थ गांवकरी)

नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार तथा संगमनेर तालुका क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार सत्यजित तांबे यांनी भारतरत्न सचिन तेंडुलकर यांची भेट घेतली असून क्रिकेटसह विविध विषयावर चर्चा केली याचबरोबर संगमनेर संगमनेर मध्ये कार्यक्रमाला येण्याचे निमंत्रण दिले आहे.

संगमनेर तालुक्याचे सुपुत्र अजिंक्य रहाणे यांनी सक्रिय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर मुंबई येथे कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी भारतरत्न सचिन तेंडुलकर, मा. कर्णधार अजिंक्य रहाणे, तेज गोलंदाज झहीर खान यांच्यासह आमदार सत्यजित तांबे संगमनेर शहराच्या नगराध्यक्ष डॉ. सौ मैथिलीताई तांबे व विविध मान्यवर उपस्थित होते.

भारतामध्ये क्रिकेट हा सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जात असून सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचा देव म्हणून ओळखले जात आहे. भारतीय क्रिकेटची मोठी सेवा करताना सचिन तेंडुलकर यांनी प्रत्येकाच्या हृदयात स्थान निर्माण केली असून भारत सरकारने सर्वोच्च अशा भारतरत्न पुरस्काराने गौरवले आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथे मूकबधिर व मतिमंद विद्यालयासाठी सचिन तेंडुलकर यांनी आपल्या खासदार निधीतून ५० लाख रुपयांचा निधी दिला होता.

अजिंक्य रहाणे हे संगमनेरचे सुपुत्र असून संगमनेर तालुक्यातील विविध कार्यक्रमासाठी ते सातत्याने उपस्थित असतात सक्रिय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे यांना त्यांच्या क्रिकेट अकॅडमी साठी निमंत्रित केले होते.





मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमासाठी जिल्ह्याचे सुपुत्र झहीर खान व अजिंक्य रहाणे यांच्या समवेत भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्याबरोबर आमदार सत्यजित तांबे यांनी आपुलकीने गप्पा मारल्या याचबरोबर संगमनेरच्या भेटीचे निमंत्रण आमदार सत्यजित तांबे यांनी यावेळी सचिन तेंडुलकर यांना दिले.

या प्रसंगी बोलताना आमदार तांबे म्हणाले की अजिंक्य रहाणे व झहीर खान यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव क्रिकेटच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे या दोन्ही जिल्ह्याच्या सुपुत्रांचा जिल्ह्याला आणि संगमनेर तालुक्याला सदैव अभिमान आहे. सचिन तेंडुलकर हे तर भारतातील प्रत्येकासाठी दैवत आहे. आदर्श व्यक्तिमत्व असलेले तेंडुलकर हे आपले आवडते क्रिकेटपटू असून संगमनेर मध्ये येण्यासाठी त्यांना आपण निमंत्रण दिले आहे.

या कार्यक्रमांमध्ये सचिन तेंडुलकर,अजिंक्य राहणे आणि झहीर खान यांच्यासमवेत आमदार सत्यजित तांबे नगराध्यक्ष डॉ मैथिलीताई तांबे यांनी क्रिकेटच्या तीन पिढ्यांच्या आठवणी, गप्पा, ग्रामीण व शहरी भागातील क्रिकेट, विविध स्पर्धा याबाबत आपुलकीने मनमोकळेपणाने संवाद केला.

# जिल्हा परिषद मांडेवाडी शाळेत आजी-आजोबा दिन उत्साहात

## आजी-आजोबांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना संस्कारांची शिदोरी



अकोले (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडेवाडी येथे आजी-आजोबा दिन उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जीवनात आजी-आजोबांचे असलेले महत्त्व, त्यांच्या अनुभवातून मिळणारे संस्कार आणि कुटुंबातील पिढ्यांमधील स्नेह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपल्या आजी-आजोबांचे शाळेत स्वागत करून त्यांच्याप्रती असलेला आदर व प्रेम व्यक्त केले. अनेक आजी-आजोबांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या बालपणीच्या आठवणी, जुन्या काळातील जीवनशैली, पारंपरिक खेळ, सण-उत्सव आणि संस्कारमूल्यांच्या विविध आठवणी सांगितल्या. त्यांच्या अनुभवकथांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांसाठी वाचनालयातील पुस्तकांतून कविता, गाणी, छोटे भाषण सादर केले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या आजी-आजोबांविषयीच्या भावना व्यक्त करत त्यांच्या सहवासातून मिळणाऱ्या प्रेमाची आणि मार्गदर्शनाची आठवण सांगितली. त्यामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि आनंददायी वातावरण लाभले.

आजी-आजोबा हे कुटुंबातील संस्कारांचे महत्त्वाचे केंद्र असून त्यांच्या अनुभवातून मुलांना जीवनमूल्ये, परंपरा, कष्ट, माणुसकी आणि नात्यांची जपणूक शिकता येते. आजच्या बदलत्या जीवनशैलीत मुलांना आजी-आजोबांच्या सहवासाची आणि त्यांच्या अनुभवांची ओळख करून देणे गरजेचे आहे, असे मत मुख्याध्यापक ज्ञानदेव फापाळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या दादाभाऊ रंधे, हरिभाऊ बर्डे, संपत बर्डे, शांताराम मांडे, सिताराम ढोकरे, विकास मांडे, वैभव रंधे, माया बर्डे , रुक्मिणी मांडे, हिराबाई शेळके, नंदा बर्डे, नाना माळी आदी आजी-आजोबांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांसोबत काही वेळ घालवताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्याचे सांगितले.

# जिल्हा बँक निवडणुकीत उमेदवारी अर्जांची संख्या वाढली; आज १६६ फॉर्मची विक्री, एकूण ८४६

**अहिल्यानगर, दि. १ : दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहिल्यानगरच्या पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-२०३१ साठी उमेदवारी अर्ज विक्री आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. गुरुवारी (दि. १ ऑक्टोबर) दिवसभरात तब्बल १६६ उमेदवारी अर्जांची विक्री झाली असून, आजअखेर एकूण ८४६ उमेदवारी अर्जांची विक्री झाल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली. विविध मतदारसंघांतून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज दाखल केले जात असल्याने निवडणुकीचे वातावरण आता अधिक स्पष्ट होत आहे.**



प्राथमिक कृषी पतपुरवठा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, धान्य अधिकोष सहकारी संस्था तसेच तत्सम इतर संस्था मतदारसंघात जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत. अहिल्यानगर तालुक्यातून हराळ बाळासाहेब रघुनाथ यांनी अर्ज दाखल केला. पाथर्डी तालुक्यातून राजळे मोनिका राजीव आणि शेटे कडुचंद भानुदास, तर राहुरी तालुक्यातून प्राजक्त तनपुरे आणि हर्ष तनपुरे यांची नोंद झाली आहे. जामखेडमधून सचिन घुमरे आणि अमोल राळेभात, तसेच कोपरगावातून संजय शिंदे आणि अनिल कदम यांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत.

अकोले तालुक्यातील मतदारसंघातही उमेदवारी अर्ज दाखल करण्यास चांगलीच गती आली आहे. उपलब्ध नोंदीनुसार किरण लहामटे यमाजी, शरद चौधरी कारभारी, संजीवनी शिंदे गोविंद, सिताराम गायकर कोंडाजी, बाबासाहेब भोर दत्तात्रय, रावसाहेब वाकचौरे रामराव, कैलास वाकचौरे भास्कर, वैभव पिचड मधुकर, विकासराव शेटे कचरू, प्राजक्त तनपुरे प्रसाद आणि हर्ष तनपुरे अरुण आदींच्या नामनिर्देशनपत्रांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. काही उमेदवारांनी एकापेक्षा अधिक नोंदी किंवा संबंधित मतदारसंघाच्या प्रक्रियेनुसार अर्ज दाखल केल्याचे निवडणूक कार्यालयाच्या यादीत दिसून येते.

कर्जत तालुक्यातून तुषार पिसाळ, अंबादास पिसाळ, देविदास देशमुख, मंगेश जगताप, मंजुषा गुंड आणि ज्योती शिंदे यांच्या नामनिर्देशनपत्रांच्या नोंदी आहेत. श्रीरामपूरमधून करण ससाणे, श्रीगोंदा तालुक्यातून राहुल जगताप आणि राजेंद्र नागवडे, तर शेवगावमधून चंद्रशेखर घले आणि राजश्री घुले यांनी अर्ज दाखल केले आहेत. पारनेर तालुक्यातून गितांजली शेळके, काशिनाथ दाते, निलेश लंके, आशुतोष काळे, रावसाहेब वाकचौरे आणि अंकुश शेळके यांची नावे निवडणूक कार्यालयाच्या नोंदीत आहेत.

बिगरशेती संस्था मतदारसंघातही अर्ज दाखल:

जिल्हा बँकेच्या बिगरशेती संस्था मतदारसंघातही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून विविध तालुक्यांतील उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उपलब्ध यादीमध्ये धनलक्ष्मी हजारे, प्रशांत गायकवाड, संजयकुमार कर्नावट, राजेंद्र नागवडे, बाळासाहेब नाईकवाडी, परीघा विश्वासराव आरोटे, अविनाश कानवडे, संजय भळगट, नंदकिशोर औटाडे, वसंत लोढा, सचिन देसरडा, जनार्दन पटारे, अशोक थोरे आणि अमोल गर्ने आदींचा समावेश आहे.

तसेच याच मतदारसंघाशी संबंधित पुढील नोंदींमध्ये मंजुषा गुंड, चंदा गर्जे, अनुराधाताई नागवडे, सुवर्णा लहामगे, संजीवनी शिंदे, सोनल गायकवाड, जयमाला सोलेपाटील, रेखा नवले, शैलजा लोटके आणि संगिता वाघ आदी उमेदवारांची नावे आहेत. त्यामुळे बिगरशेती संस्था मतदारसंघातही इच्छुकांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे.

राखीव मतदारसंघांतही उमेदवारी:

इतर मागासवर्ग राखीव मतदारसंघात प्रशांत गायकवाड, आजिनाथ हजारे, आण्णासाहेब शेलार, शरद चौधरी, करण ससाणे, नितीन खेतमाळस, अंकुश शेळके, कडुचंद शेटे, किरण लहामटे, तुकाराम मंगाळ, प्रकाश सदाफुले आणि वैभव पिचड आदी उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांच्या नोंदी झाल्या आहेत. त्याचप्रमाणे वि.जा.भ.ज. किंवा वि.मा.प्र. राखीव मतदारसंघात सुनिता नगरे, अशोक महारनवर, ऋषिकेश ढाकणे आणि अशोक थोरे आदी उमेदवारांची नावे नोंदविण्यात आली आहेत.

निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि. १ ऑक्टोबर रोजी विविध मतदारसंघांतील प्राप्त नामनिर्देशनपत्रांची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. आगामी काळात अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर छाननी, अर्ज मागे घेण्याची मुदत आणि अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कोणकोणते उमेदवार अंतिम रिंगणात राहतात, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

# अंधजन मंडळाच्या गरजू दिव्यांगांना मदतीचा हात; डव्होकेट मित्र मंडळाचा सामाजिक आदर्श



अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)

डव्होकेट मित्र मंडळाच्या वतीने अंधजन मंडळाच्या गरजू दिव्यांगांना किराणा किटचे वाटप करून मदतीचा हात दिला.

अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर,ॲड. सचिन भोजने, ड.संदीप पाखरे,ॲड. प्रविण भोर , ॲड. तन्वीर शेख, ॲड.प्रियंका खाटेकर, ॲड. संतोष दराडे, ॲड. आदिनाथ भोजने, ॲड. नाजीम शेख,ॲड. समीर वखारी,ॲड. संदीप बोघाडे, ॲड. फरहान शेख,ॲड.पराग काळे, ड.संदीप लांडगे, ॲड.ज्ञानेश्वर पाडेकर , अंधजन मंडळाचे अनिल चाबुकस्वार, गोरख दरंदले,शाम कोकणे, मनिष वैराळ आदी उपस्थित होते.

संभाजी भोर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, डव्होकेट मित्र परिवाराने सामाजिक उत्तरदायित्व जपत गरजू दिव्यागांसाठी मदतीचा पुढाकार घेतला हे कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे. अश्या उपक्रमामुळे परस्पर सहकार्य, संवेद्यशीलता आणि मानवतेची भावना अधिक दृढ होते.

सचिन भोजने म्हणाले की समाजातील प्रत्येक व्यक्तीने मदतीचा हात पुढे केल्यास अनेक गरजू दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात आनंद आत्मविश्वास व नव्या आशेचा प्रकाश निर्माण होईल. एडवोकेट मित्र मंडळाच्या वतीने भविष्यातही सामाजिक कामात अग्रेसर राहील.

सूत्रसंचालन गोरख दरंदले यांनी केले.आभार अनिल चाबुकस्वार यांनी मानले.